# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी २० ते २६ जून २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| | जून मधील पाऊस (मि.मी मध्ये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | सल्ला |
| महाराष्ट्र | | | | | | | | |
| नागपूर | ११ | ७ | २ | ४ | ५ | ५ | ३ | मागील वर्षाचे काडी—कचरा, वाया गेलेले कापसाचे तुकडे माणसामार्फत वेचून घ्यावे कारण त्यामुध्ये किडी व रोगास कारणीभूत असणारे घटक असतात. त्यामुळे पिकांच्या आरोग्यासाठी स्वच्छ मशागत करणे गरजेचे आहे. चांगले कुजलेले शेणखत प्रति २—३ टन/हेक्टर किंवा गांडूळखत २.५ टन प्रति हेक्टर ३—४ वर्षातून एकदा १०—१५ दिवसापूर्वी टाकून घ्यावे त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढेल. त्यानंतर मोल्ड बोर्ड नांगराणे नांगरणी (२०—२५ सेंमी) खोल करावी त्यामुळे कुजलेले किंवा गांडुळखत जमिनीत गाडले जाईल. त्यानंतर जमिनीवरील ५ सेंमी पेक्षा जास्त मोठी ढेकळे फोडून काढावी. पहिल्या पावसानंतर वापराचे तणनाशक पेन्डीमिथेलिन प्रति ३.५ लि/हे (१ किलो प्रति हेक्टर) घेवून जमिनीवरती फवारणी करावी. ब्लेड असलेल्या वखराने २—३ वेळा वखरणी करावी त्यामुळे माती मोकळी होईल. त्यानंतर जमिन भुसभुशीत होण्यासाठी जमिनीमध्ये ट्रॅक्टर रोटावेटर (१५—२० सेंमी) वापरावा. मध्यम आणि उथळ जमिनीमध्ये १५ सेंमी खोल आणि १५०—१८० सेंमी लांब आणि ३० सेंमी रूंद असा वरंभा तयार करावा. खोल जमिनीसाठी अरूंद सरी ट्रॅक्टर किंवा नांगराचा वापर करून तयार करावी. तिफनेचे अंतर वाणांच्या गरजेनुसार करून घ्यावे. सुरूवातीला देण्यात येणारी नत्र आणि स्फुरद ची खताची मात्रा मध्यम स्वरूपाची देण्यात यावी. एक नीमयुक्त युरियाची पिशवी (५० किलो) + सिंगल सुपर फॉस्फेट (३०० किलो) ची पिशवी एकत्र करून पेरणीच्या वेळेस देण्यात यावी. कापसाच्या बियाण्यास ॲझेटोबॅक्टर प्रति २५ ग्रॅम/किलो बियाणे फॉस्फरस सोल्युबलाईझींग बॅक्टेरिया (पी.एस.बी.) प्रति २५ ग्रॅम आणि ट्रायकोड्रामा विरीडी प्रति ८ ग्रॅम/किलो या प्रमाणे घेवून बियाण्यास बीप्रक्रिया करावी व नंतर बीज १५—३० मिनीट सावलीत कोरडे होण्यासाठी ठेवावे व या बियाण्यांची २४ तासामध्ये पेरणी करावी. |
| वर्धा | ११ | ४ | १२ | ५ | ४ | २ | ३ | |
| चंद्रपूर | ७ | ३ | ५ | २ | ४ | १३ | ६ | |
| यवतमाळ | ३ | ४ | ५ | ४ | १० | ६ | ३ | |
| अमरावती | १५ | ३ | १ | ४ | ११ | ४ | ३ | |
| अकोला | १२ | २ | १ | १ | ११ | ४ | २ | |
| बुलढाणा | ४ | ० | १ | ६ | १४ | ५ | ४ | |
| परभणी | १० | ३ | ५ | ४ | ३ | ६ | ७ | |
| नांदेड | ३ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ३ | |
| बीड | ११ | २ | १० | ५ | ५ | ७ | ८ | |
| वाशिम | ६ | ० | | | | | | |
| धुळे | ५ | १० | ९ | ० | ० | ३ | १९ | |
| जळगांव | ७ | ७ | १४ | ९ | ० | ३ | १० | |
| जालना | ५ | १ | ८ | ४ | ० | ९ | ७ | |
| औरंगाबाद | ६ | ३ | १५ | ३ | ० | ९ | १० | |